मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती व जनसंपर्क विभाग

प्रसिद्धीपत्रक

· स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत ‘स्वच्छ शहर जोडी’ या मोहिमेची MoU स्वाक्षरी सोहळा यशस्वीरित्या संपन्न!

दि. 27.09.2025 रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मुख्यालयात महाराष्ट्रातील ५ शहरे बीड नगरपरिषद, धर्माबाद नगरपरिषद, तलासरी नगरपंचायत, मोखाडा नगरपरिषद, देगलूर नगरपरिषद असे एकूण ५ शहरांसोबत सामंजस्य करार करण्यात आला. यात मिरा भाईंदर महानगरपालिकेकडून या पाच शहरांना पुढील १०० दिवसांमध्ये मार्गदर्शन तसेच सहाय्य केले जाईल. याचा प्रमुख उद्देश या 5 शहरांमध्ये विविध उपाय व योजनांमार्फत स्वच्छतेची गुणवत्ता वाढवणे हा आहे. केंद्रिय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्री मा.ना.श्री. मनोहरलाल खट्टर,राज्यमंत्री मा.ना.श्री. तोखन साहू व मंत्रालयीन सचिव यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार (MoU) करण्यात आला.

केंद्रीय शहरी विकास मंत्रालयाच्या स्वच्छ भारत मिशन २.० अंतर्गत; स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये मिरा भाईंदर महानगरपालिकेस ३ ते १० लाख लोकसंख्या गटातील शहरांमध्ये राष्ट्रपती पुरस्काराने सन्मानित केले होते, त्याचा पुढील टप्पा म्हणून ‘स्वच्छ शहर जोडी’ या मोहिमेचे आज अनावरण झाले. यात मिरा भाईंदर महानगरपालिकेस या 5 शहरांना मार्गदर्शन करण्याचा बहुमान प्राप्त झाला आहे. तसेच महाराष्ट्रातील ५ शहरे बीड नगरपरिषद, धर्माबाद नगरपरिषद, तलासरी नगरपंचायत, मोखाडा नगरपरिषद, देगलूर नगरपरिषद असे एकूण ५ शहरांसोबत सामंजस्य करार करण्यात आला. ज्यात येत्या स्वच्छ सर्वेक्षणच्या स्थळ पाहणी दरम्यान जे शहर चांगली कामगिरी करेल त्यांचे मूल्यांकन / स्थळपाहणी ही मिरा भाईंदर महानगरपालिका सोबत होणार आहे. या मार्गदर्शनाचा कृती आराखडा (Action Plan) सादर करण्याचे निर्देश मा. मंत्री महोदयांनी दिले.

आज २०० शहरांचा MoU स्वाक्षरी ऑनलाईन व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे पार पडला. ज्यामध्ये उक्त शहरांसोबत सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी मिरा भाईंदर महानगरपालिकातर्फे डॉ. संभाजी पानपट्टे अतिरिक्त आयुक्त (१), श्री. योगेश गुणीजन, सहाय्यक आयुक्त घनकचरा व्यवस्थापन विभाग आणि श्री. जितेंद्र कांबळे, सहाय्यक आयुक्त उपस्थित होते. तसेच तलासरी नगरपंचात, बीड नगर परिषद व धर्माबाद नगर परिषद यांचे मुख्याधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

योगेश गुणीजन
(सहा. आयुक्त)